# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना** :- नागपूर शहराकरीता आर्टिक्युलेटेड बस प्रणाली ई-निविदा
**{ परिवहन विभाग }** प्रकियेअंतर्गत दि. २३/०७/२०२५ रोजी मा. आयुक्त तथा प्रशासक मनपा यांचे कक्षात मा. समिती बैठकीत निम्नतम निविदाकार मे. टी.एम.एल. स्मार्टसिटी मोबिलिटी सोल्युशन लि. यांनी दिलेल्या ऑफर दरावर चर्चा करण्यात आली.चर्चे नंतर मे. टी.एम.एल. स्मार्टसिटी मोबिलिटी सोल्युशन लि. यांनी सुधारीत दर रू. ६२.०० प्रति कि.मी. सादर केलेला आहे. या सभेमध्ये सखोल चर्चा व विचार विनिमय होवून निविदा समितीने मे. टी.एम.एल. स्मार्टसिटी मोबिलिटी सोल्युशन लि. यांनी दिलेला सुधारीत दर रू. ६२.०० प्रति कि.मी, मंजुर करण्याची शिफारस केली असुन मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दि. २४/०७/२०२५ अन्वये निविदेस मंजुरी प्रदान केली आहे.

रु. १४८ कोटीचे कॅपेक्स अनुदानासह संपूर्ण प्रकल्पास मान्यताकरीता केंद्रशासनाच्या रस्ता वाहतुक व महामार्ग मंत्रालय यांना प्रस्ताव पाठविण्यात आलेला असुन निम्नतम निविदाकार मे. टी.एम.एल. स्मार्टसिटी मोबिलिटी सोल्युशन लि. यांनी दिलेले सुधारीत दर रू. ६२.०० प्रति कि.मी स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप:**- सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 38/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 04/08/2025**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार परिवहन व्यवस्थापक, परिवहन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहराकरीता आर्टिक्युलेटेड बस प्रणाली ई-निविदा प्रकियेअंतर्गत दि. २३/०७/२०२५ रोजी मा. आयुक्त तथा प्रशासक मनपा यांचे कक्षात मा. समिती बैठकीत निम्नतम निविदाकार मे. टी.एम.एल. स्मार्टसिटी मोबिलिटी सोल्युशन लि. यांनी दिलेल्या ऑफर दरावर चर्चा करण्यात आली.चर्चे नंतर मे. टी.एम.एल. स्मार्टसिटी मोबिलिटी सोल्युशन लि. यांनी सुधारीत दर रू. ६२.०० प्रति कि.मी. सादर केलेला आहे. या सभेमध्ये सखोल चर्चा व विचार विनिमय होवून निविदा समितीने मे. टी.एम.एल. स्मार्टसिटी मोबिलिटी सोल्युशन लि. यांनी दिलेला सुधारीत दर रू. ६२.०० प्रति कि.मी, मंजुर करण्याची शिफारस केली असुन मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दि. २४/०७/२०२५ अन्वये निविदेस मंजुरी प्रदान केली आहे.

रु. १४८ कोटीचे कॅपेक्स अनुदानासह संपूर्ण प्रकल्पास मान्यताकरीता केंद्रशासनाच्या रस्ता वाहतुक व महामार्ग मंत्रालय यांना प्रस्ताव पाठविण्यात आलेला असुन निम्नतम निविदाकार मे. टी.एम.एल. स्मार्टसिटी मोबिलिटी सोल्युशन लि. यांनी दिलेले सुधारीत दर रू. ६२.०० प्रति कि.मी स्विकृत करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.